## दिन विशेष...

१८०० : नानासाहेब फडणवीस यांचा मृत्यू.
१८५४ : नागपूर रियासतीची समाप्ती झाली.
१९२८ : कुमारी नॅन्सी मिलरचा हिंदू धर्मात प्रवेश या दिवशी झाला.
१९२६ : रवींद्र पिंगे यांचा जन्मदिन.
१९६९ : भारतीय गणितशास्त्रज्ञ मोहिनीराज लक्ष्मण दत्तात्रेय यांचे निधन.

महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125

| सेन्सेक्स | ७६,०३४.४२ | –८२९.२९ (१.०८%) |
| --- | --- | --- |
| डॉलर | ₹ ९२.२७ | |

**आजचे तापमान** (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
| --- | --- | --- |
| जळगाव | ४० | १८ |
| दिल्ली | ३३ | २० |
| मुंबई | ३८ | २३ |
| नागपूर | ३९ | १९ |
| पुणे | ३९ | १६ |

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | शुक्रवार , दि. १३ मार्च २०२६ | वर्ष २ रे | अंक १२१ किंमत : ५ रु. | पाने ४


### सुविचार

जीवनातील प्रत्येक क्षण हा एक नवीन सुरुवात आहे. भूतकाळाच्या चिंतेसोडून, आजच्या क्षणाला जगा.

सूर्योदय – सूर्यास्त
स.-६:३८ संध्या-६:३६

### सोने – चांदी

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,६४,६३५/- २,८०,०००/-

### केळी भाव

नवती : ---- ते ----
पिल बाग : ---- ते ----
कांदे बाग : ----

# भारताकडे पुरेसा इंधन साठा, एलपीजीचे उत्पादन वाढवले

## केंद्रीय मंत्री हरदीप पुरी यांनी लोकसभेत दिली माहिती

वृत्तसंस्था । नवी दिल्ली



भारत रशियाकडून तेल खरेदी करतो की नाही? याची माहिती आम्हाला मिळाली पाहिजे अशी मागणी लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज लोकसभेत केली. तसंच भारताबाबतचे निर्णय अमेरिका का घेते आहे? असाही प्रश्न त्यांनी विचारला त्यानंतर उत्तर द्यायला केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंह पुरी उभे राहिले. त्यांनी देशात इंधनाची काय स्थिती आहे याची माहिती दिली. दरम्यान सिंह उभे राहिले तेव्हा 'एपस्टिन का दोस्त आया' अशा घोषणा विरोधकांनी दिल्या.

हरदीप पुरी यांनी माहिती दिली की भारताकडे कच्च्या तेलाचा साठा उपलब्ध आहे. डिझेल, पेट्रोल आणि गॅस सिलिंडर यांची कमतरता भासणार नाही. एलएनजी कार्गो रोज येत आहेत. दुसऱ्या कार्गोंच्या मार्फतही पुरवठा होतो आहे. पुरवठा १०० टक्के (पान २ वर)

### भारत ४० देशांकडून कच्चं तेल घेतो-पुरी

हरदीप पुरी पुढे म्हणाले, इतिहासात अशा प्रकारचं युद्ध जगाने कधीही पाहिलेलं नाही. मात्र मी हे सांगू इच्छितो की भारत कच्च्या तेलाच्या पुरवठ्याबाबत सुरक्षित आहे. सध्या जे संकट इराण, इस्रायल युद्धामुळे ओढवलं आहे त्याआधी भारत ४५ टक्के क्रूड ऑईल होर्मुजच्या मार्गाने घेत होता. सध्या भारताकडे इंधनाचा पुरेसा साठा आहे. पेट्रोल, डिझेल, टर्बाइन फ्युएल, केरोसीन, फ्युएल ऑईल यांचा तुटवडा नाही. भारतात येणारं ५५ टक्के कच्चं तेल दुसऱ्या ठिकाणाहून येत होतं. आता हे प्रमाण वाढवून आपण ७० टक्के केलं आहे. २००६–२००७ मध्ये आपण २७ देशांकडून कच्चं तेल घेत होतो. सध्या आपण ४० देशांकडून कच्चं तेल घेत आहोत. आपल्याकडे ज्या देशांचे पर्याय उपलब्ध आहेत ते इतर देशांकडे नाहीत असंही पुरी यांनी सांगितलं. मागील ५ दिवसांमध्ये चं उत्पादन २८ टक्क्यांनी वाढवण्यात आलं आहे. भारतात राहणारे ३३ कोटी कुटुंबं जे गरीब आणि दारिद्र्य रेषेखालील आहेत त्यांना स्वयंपकासाठी गॅस सिलिंडर मिळाला पाहिजे ही भारत सरकारची प्राथमिकता आहे. असंही पुरी यांनी स्पष्ट केलं.

# राज्यात गॅसचा तुटवडा होणार नाही : पंतप्रधान मोदी बारकाईने लक्ष ठेऊन

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंकडून स्पष्टीकरण

वृत्तसंस्था । मुंबई



**इराण–अमेरिका आणि इस्त्राइल युद्धामुळे भारतात अनेक राज्यांमध्ये गॅस तसेच इंधनाची टंचाई निर्माण झाली आहे. महाराष्ट्रात अनेक जिल्ह्यांमध्ये नागरिकांनी गॅस सिलिंडरसाठी एजन्सीच्या बाहेर मोठ्या रांगा लावल्या आहेत. काही ठिकाणी पोलिस बंदोबस्तात सिलिंडर वितरण केले जात आहे.**

एकनाथ शिंदे म्हणाले, केंद्र सरकार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी बारकाईने लक्ष ठेऊन आहेत. कोणीही अफवा पसरावू नये, असे आवाहनही शिंदे यांनी केले आहे. ते म्हणाले, गॅसचा तुटवडा होणार नाही याची काळजी घेतली जात आहे. काही लोक अफवा पसरवत आहेत, पण कोणीही अफवांवर विश्वास ठेवू नका. नागरिकांना त्रास होऊ नये म्हणून केंद्र सरकार आणि राज्य सरकार समन्वयाने काम करत असल्याची माहिती शिंदे यांनी दिली आहे.

याचसोबत राज्यातील तहसील कार्यालयातील विशेष पथक व गॅस एजन्सीकडून देखील अफवांवर विश्वास ठेवू नका, असे आवाहन नागरिकांना करण्यात आले आहे. गॅस सिलिंडरचा कुठेही तुटवडा नसून ग्रामीण भागातील दुर्लभ विक्रेत्यांकडे ४५ दिवसांनी तर (पान २ वर)

### थोडक्यात



#### अर्शदीपने माफी मागायची गरज नव्हती

**मुंबई ।** आयसीसी टी–२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेतील अंतिम सामना भारत आणि न्यूझीलंड या दोन्ही संघांमध्ये पार पडला. हा सामना जिंकून भारतीय संघाने लागोपाठ दुसऱ्यांदा जेतेपदाचा मान मिळवला होता. भारतीय संघाने पहिल्या डावात फलंदाजी करताना २५५ धावांचा भलामोठा डोंगर उभारला होता. अंतिम सामन्यात इतक्या मोठ्या आव्हानाचा पाठलाग करणं मुळीच सोपं नसतं. धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या न्यूझीलंडचा डाव अवघ्या १५९ धावांवर आटोपला. त्यामुळे सामन्यात असं फार काही घडलं नाही. पण अर्शदीप सिंगने डॅरिल मिशेलला मारून फेकलेला थ्रो चर्चेचा विषय ठरला.

#### मणिपूरमध्ये कुकी–नागा गटात वाद उफाळला

**उखरुल ।** मणिपूरमधून कुकी गटाने एका लष्करी जवानासह २० जणांना ओलीस ठेवले आहे. उखरुल जिल्ह्यातील लिटन पोलिस ठाणे हद्दीत ही घटना घडली. रजेवर असणारा जवान उखरुल–इम्फाळ रस्त्यावरुन जात असताना त्याला ताब्यात घेण्यात आले व ओलीस ठेवण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. नागा आणि कुकी समुदायात झालेल्या वादातून ही घटना घडली आहे. कुकी गट नागा गटाने केलेल्या गोळीबाराला उत्तर देत होता.

### हवामान खात्याने दिला वादळी वाऱ्यासह पावसाचा इशारा

# उष्णतेच्या लाटेसोबतच राज्यावर 'अवकाळी'चेही सावट



वृत्तसंस्था । पुणे

**राज्यातील हवामानात सातत्याने मोठे बदल होत आहेत. कमाल तापमान ४१ अंश सेल्सिअसवर पोहचले असताना आता पुन्हा एकदा अवकाळी पावसाचा इशारा हवामान खात्याने दिला आहे.**

राज्यात यंदा फेब्रुवारीच्या मध्यान्हपासूनच ऊन तापायला सुरुवात झाली. मार्च महिन्याच्या दुसऱ्याच आठवड्यात कमाल तापमानाने चाळीशी ओलांडली. विदर्भात अकोला जिल्ह्यात बुधवारी सर्वाधिक ४१ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. तर हवामान खात्यानेही विदर्भातील काही जिल्ह्यांना उष्णतेच्या लाटेचा (पान २ वर)

# धुळे येथील पिता–पुत्राच्या खूनप्रकरणी माजी नगराध्यक्षांसह ११ जणांना दुहेरी जन्मठेप

प्रतिनिधी । धुळे

**देवपुरातील रावसाहेब पाटील आणि वैभव पाटील या पिता–पुत्रांच्या खून प्रकरणात अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश जयश्री पुलाटे यांनी आरोपी माजी नगराध्यक्ष बाजीराव पवार, त्याचा पुत्र गौरव पवार, जयराज पाटील यांच्यासह ११ आरोपींना दुहेरी जन्मठेपेची, तर एका आरोपीस पाच वर्षांची शिक्षा सुनावली. या निकालाने आरोपींना रडू कोसळले. तर त्यांच्या नातेवाईकांना अश्रू अनावर झाले.**



देवपूर परिसरात आठ जून २०१८ रोजी पूर्ववैमनस्यातून रावसाहेब पाटील व त्यांचा मुलगा वैभव पाटील या पिता–पुत्रांची निर्घृण हत्या करण्यात आली होती. याप्रकरणी देवपूर पोलीस ठाण्यात १३ जणांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल झाला होता. या खून खटल्याची सुनावणी जिल्हा सत्र न्यायाधीश जयश्री पुलाटे यांच्या समोर झाली. उभय पक्षाचा युक्तिवाद, (पान २ वर)

### या ११ आरोपींना झाली जन्मठेप

या प्रकरणात माजी नगराध्यक्ष बाजीराव ऊर्फ सुभाष सजन पवार, भूपेश वाल्मिक पाटील, हर्षल ऊर्फ दादू रविंद्र पाटील, जयराज शामकांत पाटील, ऋषिकेश शामकांत पाटील, दर्शन अंबादास परदेशी, भगवान नानाभाऊ अहिरे, अर्जुन ऊर्फ आप्पा भगवान अहिरे, गौरव बाजीराव पवार, भूषण बाबुराव कापकर आणि भूषण निंबा पगारे या ११ आरोपींना दोषी ठरविण्यात आले. भा.दं.वि. कलम ३०२ अन्वये सर्व ११ जणांना तर संदीप ऊर्फ विक्की दिलीप वेळीस यास भा.दं.वि. कलम २१२ अंतर्गत आरोपींना पळून जाण्यास मदत केल्याप्रकरणी दोषी ठरविण्यात आले.

# विधानभवनासह चार ठिकाणे बॉम्बने उडवून देण्याची धमकी

वृत्तसंस्था । मुंबई

**विधिमंडळ बॉम्बने उडवून देऊ, असा धमकीचा मेल आज सकाळी आल्याने विधिमंडळ परिसरात एकच खळबळ उडाली आहे. या मेलनंतर पोलिसांनी तात्काळ विधानसभा परिसरात सर्च ऑपरेशन सुरु केले आहे.**

पोलिसांनी विधानभवन परिसरात कर्मचाऱ्यांना ओळखपत्राची तपासणी केल्यानंतर सोडले आहे. मात्र, या धमकीच्या मेलची राज्यभरात चर्चा होत आहे. बॉम्ब डिस्पोजल स्कॉडने सर्व सखोल तपास सुरू केली आहे. धक्कादायक बाब म्हणजे या मेलमध्ये मुंबईतील आणखी चार ठिकाणी बॉम्बने उडवून देण्याची धमकी देण्यात आली आहे. यानंतर विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांनी प्रतिक्रिया देत या धमकीच्या मेलबाबत महत्वाची माहिती दिली आहे. 'आज सकाळी सीपीएच्या मेलवर धमकी आली. अर्थसंकल्पीय अधिवेशन असल्यामुळे बॉम्ब आणि मिसाईलची धमकी होती. बॉम्ब डिस्पोजल स्कॉडने सर्व सखोल तपास सुरू केली आहे. आणखीन चार ठिकाणी धमकी दिली आहे, पोलिसांनी आवश्यक ती दखल घेतली आहे, असे राम शिंदे (पान २ वर)



# बेकायदेशीर बॅनर लावणाऱ्या दोघा क्लास चालकांना ६० हजारांचा दंड

## अनधिकृत बॅनरबाजीवर मनपाचा प्रहार

प्रतिनिधी । जळगाव



**जळगाव शहराच्या विद्रुपीकरणाला कारणीभूत ठरणाऱ्या अनधिकृत बॅनर आणि स्टिकर्सवर महानगरपालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन विभागाने मोठी कारवाई केली आहे. बुधवारी राबवलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत, मू.जे. महाविद्यालय परिसरात विनापरवाना फलक लावणाऱ्या दोन खाजगी क्लास चालकांना प्रत्येकी ६० हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे.**

शहराच्या सौंदर्याला बाधा आणणाऱ्या आणि वाहतुकीला अडथळा ठरणाऱ्या अनधिकृत बॅनरबाजीवर मनपा प्रशासनाने कडक पाऊले उचलली आहेत. अग्रवाल चौक ते मू.जे. महाविद्यालय या परिसरात राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक संस्थांच्या बॅनरचा मोठा सुळसुळाट झाला होता.

बुधवारी सकाळी मनपाच्या पथकाने या भागात धडक मोहीम राबवून सुमारे ६० मोठे बॅनर जप्त केले. केवळ मोठे बॅनरच नव्हे, तर शहरात ठिकठिकाणी भिंतींवर, खांबांवर आणि सार्वजनिक ठिकाणी हजारोच्या संख्येने लहान फलक व विनापरवाना स्टिकर्स लावून जाहिरातबाजी करणाऱ्या दोन खाजगी क्लास चालकांवर मनपाने थेट आर्थिक दंडाचा बडगा उगारला आहे. नियमांचे उल्लंघन करून शहराचे विद्रुपीकरण केल्याबद्दल डंबेलकर आणि पेस अकॅडमी या क्लास चालकांना प्रत्येकी ६० हजार रुपयांच्या दंडाची नोटीस बजावण्यात आली आहे.

**• मनपाच्या या धडक कारवाईमुळे अनधिकृत जाहिरातदारांचे धाबे दणाणले आहेत. या कारवाईनंतर काही संस्थांनी स्वतःहून आपले अनधिकृत बॅनर आणि स्टिकर काढण्यास सुरुवात केली आहे. शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी ही मोहीम यापुढेही अशीच सुरु राहणार असल्याचे मनपा प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.**

# केळी पीकविमा घोटाळा : जळगाव जिल्ह्यातील ५५ हजार शेतकऱ्यांना नोटीस!

## शेतकऱ्यांनी सात दिवसांत खुलासा करण्याचे आदेश ; एकाच शेतजमिनीवर ४ ते ५ शेतकऱ्यांनी विमा काढल्याचे उघड

प्रतिनिधी । जळगाव

**जिल्ह्यात हवामानावर आधारित फळ पीकविमा योजनेत मोठा गैरप्रकार उघडकीस आला आहे. प्रत्यक्षात केळीची लागवड नसतानाही हजारो हेक्टर क्षेत्रावर केळी दाखवून लाभ घेण्याचा प्रयत्न झाल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी प्रशासनाने संशयित सर्व शेतकऱ्यांना नोटीस पाठविण्याची प्रक्रिया सुरू केल्याने सगळीकडे खळबळ उडाली आहे.**

महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ॲप्लिकेशन सेंटर (एमआरसॅक) मार्फत सॅटेलाइट तंत्रज्ञानाच्या सहाय्याने करण्यात आलेल्या पडताळणीत हा प्रकार उघड झाला. १ नोव्हेंबर ते १५ डिसेंबर (पान २ वर)



### – तर कायदेशीर कारवाई –

तालुकानिहाय पाहता चोपडा तालुक्यात सर्वाधिक गैरप्रकार उघडकीस आला आहे. येथे ७ हजार २४३ शेतकऱ्यांनी प्रत्यक्षात केळी नसतानाही विमा घेतल्याचे आढळले असून, सुमारे ८ हजार ४१९ हेक्टर क्षेत्रावर केळी लागवड दाखवण्यात आली होती. त्यानंतर यावल तालुक्यात ५ हजार ३६८ शेतकरी, तर रावेर, जळगाव, धरणगाव, मुक्ताईनगर आणि जामनेर या तालुक्यांमध्येही मोठ्या प्रमाणावर संशयास्पद प्रकरणे आढळून आली आहेत. दरम्यान, प्रशासनाने शेतकऱ्यांना नोटिसा देऊन स्पष्टीकरण मागवले असून, योग्य कागदपत्रे सादर न केल्यास विमा रद्द करून पुढील कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. याप्रकरणामुळे जिल्ह्यातील पीक विमा योजनेच्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. संपूर्ण प्रक्रियेची सखोल चौकशी करण्याची मागणीही आता पुढे येत आहे.

### सीएससी केंद्र चालकांवरही कारवाई?

या घोटाळ्याचा वेळेत उलगडा झाला नसता तर शासनाच्या तिजोरीला कोट्यवधी रुपयांचा फटका बसण्याची शक्यता होती. दरम्यान, शेतकऱ्यांनी भरलेली सुमारे ३७ कोटी रुपयांची विमा रक्कम राज्य शासनाने तात्पुरती जप्त केली आहे. संशयित प्रकरणांची चौकशी सुरू असून, दोषी आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे. या गैरप्रकारात काही सीएससी (कॉमन सर्व्हिस सेंटर) केंद्रांची भूमिकाही संशयास्पद असल्याचे समोर आले आहे. जिल्ह्यातील ४८ सीएससी केंद्रांवरून बोगस फॉर्म भरून देण्यात आल्याचा आरोप असून, या केंद्रचालकांवर गुन्हे दाखल करण्याची तयारी प्रशासनाने सुरू केली आहे.

## संपादकीय

### इच्छामरणाबाबतचा पहिला निकाल

प्रख्यात ब्रिटिश नाटककार विल्यम शेक्सपियरने आपल्या लोकप्रिय हॅम्लेट या नाटकामध्ये टू बी ऑर नॉट टू बी म्हणजेच जगावे की मरावे हाच खरा प्रश्न आहे, हा संवाद लोकप्रिय केला. बुधवारी सर्वोच्च न्यायालयाने इच्छामरणाबाबत एक लँडमार्क निकाल देताना शेक्सपियरच्या या नाटकाचा आणि या संवादाचा संदर्भ दिला आहे. हरियाणातील ३३ वर्षीय हरीश राणा या युवकाला पॅसिव्ह पद्धतीने इच्छामरण देण्यात यावे, अशी परवानगी सर्वोच्च न्यायालयाने दिल्यामुळे भारतातील हा पहिला निकाल ठरला आहे. २०१८ मध्ये सर्वोच्च न्यायालयानेच आपल्या एका निकालामध्ये मरण हा मूलभूत हक्क असल्याचे मान्य केले होते. इच्छा मरणाबाबत गाइडलाइन्स तयार कराव्यात असे आदेशही सरकारला दिले होते. पण त्यानंतर इच्छा मरणाबाबत सुप्रीम कोर्टाने किंवा अन्य कोणत्याही न्यायालयाने अशा प्रकारचा निकाल दिला नव्हता. पण या केसमध्ये मात्र सर्वोच्च न्यायालयाने हरीश राणा याचे सर्व वैद्यकीय उपचार थांबवून त्याला एक शांत मरण द्यावे, असे सुचवले आहे. वयाच्या विसाव्या वर्षी शिक्षण घेत असताना इमारतीच्या चौथ्या मजल्यावरून पडून ब्रेन डेड झालेल्या हरीश राणावर गेल्या १३ वर्षांपासून उपचार सुरू होते. त्याचे वयोवृद्ध आई-वडील त्याची संपूर्णपणे काळजी घेत होते. पण त्याच्या प्रकृतीत कोणतीही सुधारणा होत नव्हती. नाका तोंडाला नळ्या लावूनच त्याच्या आहाराची काळजी घेतली जात होती. हरीशवर अजून कितीही उपचार केले तरी त्याच्या प्रकृतीत कोणतीही सुधारणा होणार नाही, अशा प्रकारचा अहवाल मेडिकल बोर्डाकडून आल्याने आणि हरीशच्या आई-वडिलांनीच इच्छामरणाला परवानगी देण्याची मागणी केल्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने सर्व गोष्टींचा विचार करून हा महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे. या निकालाच्या निमित्ताने केंद्र सरकारने पॅसिव्ह युथेनेशिया म्हणजेच पॅसिव्ह पद्धतीचे इच्छामरण देणे याबाबत आणखी काही मार्गदर्शक तत्त्वे तयार करावीत असेही सांगितले आहे. रुग्णावर उपचार करणाऱ्या कोणत्याही डॉक्टरचे प्रथम ध्येय जरी रुग्णाचा जीव वाचवणे हेच असले तरी, डॉक्टर जे उपचार करत आहेत त्याचा फायदा होणार नसेल तर काय करावे हा प्रश्न नेहमीच निर्माण होतो. हरीशला तेरा वर्षे अशाच प्रकारे जगवले जात होते. खरं तर शेक्सपियरने म्हटल्याप्रमाणे अशा रुग्णांबाबतच नेहमी जगावे का मरावे हा प्रश्न निर्माण होत असतो. त्याच्या जवळच्या नातेवाईकांना या आपल्या रुग्णाविषयी कितीही काळजी वाटत असली तरी त्याची एकदा सुटका व्हावी असेही त्यांना वाटत असते. रुग्णाने दुःखात जगावे की शांतपणे मरावे हा प्रश्न त्याच्या नातलगानाच पडलेला असतो. या प्रकरणामध्येही हरीश राणाच्या आई-वडिलांनीच पुढाकार घेऊन इच्छामरणाची मागणी केल्यामुळे सर्वोच्च न्यायालयाला हा महत्त्वाचा निर्णय द्यावा लागला. रुग्णाचे सर्वोच्च हित हा एकमेव विषय समोर ठेवून सर्वोच्च न्यायालय निर्णय घेत आहे असे निकाल पत्रात न्यायालयाने म्हटले आहे. म्हणजेच जर एखाद्या रुग्णाची प्रकृती सुधारण्याची शक्यता असेल तर त्याला कधीच इच्छामरणाला परवानगी दिली जाणार नाही. पण उपचाराला अजिबात प्रतिसाद मिळत नसेल तर लाइफ सपोर्ट सिस्टीम काढून घेऊन आणि वैद्यकीय उपचार थांबून अशा रुग्णाला शांतपणे मरण्याची परवानगी दिली जाऊ शकते असे सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निकाल पत्रात सुचवले आहे. गेल्या अनेक वर्षांत सर्वोच्च न्यायालयाने आतापर्यंत जे लँडमार्क निकाल दिले त्यापैकी हा एक अत्यंत महत्त्वाचा निकाल मानावा लागेल. आगामी कालावधीमध्ये याबाबत चर्चा होणे अपेक्षित आहे आणि या निमित्ताने केंद्र सरकारने आपल्या पातळीवर हालचाली करून इच्छामरणाबाबत काही आदर्श मार्गदर्शक तत्त्वे तयार करणेसुद्धा महत्त्वाचे आहे. अर्थात हा विषय नेहमीच सर्वोच्च न्यायालयासमोर जाणार आहे.

# तळोद्याच्या सर्वांगीण विकासासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही!

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची ग्वाही, नगराध्यक्षा भाग्यश्री चौधरी यांनी घेतली भेट

प्रतिनिधी । तळोदा

**तळोदा शहराच्या विकासकामांना गती देण्यासाठी आणि शहराचा चेहरामोहरा बदलण्यासाठी लोकनियुक्त नगराध्यक्षा भाग्यश्री योगेश चौधरी यांनी राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची मुंबई येथे भेट घेतली. या भेटीत शहराच्या विविध मूलभूत सुविधा आणि विकास कामांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली असून, तळोदा नगरपालिकेला विकासासाठी कोणत्याही प्रकारचा निधी कमी पडू दिला जाणार नाही, अशी ग्वाही सुनेत्रा पवार यांनी दिली आहे.**



नगराध्यक्षा भाग्यश्री चौधरी यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांची काल मुंबई येथील शासकीय निवासस्थानी भेट घेत शहरातील विकास कामांसंदर्भात चर्चा केली. झालेल्या चर्चेत शहरातील रस्ते, पाणीपुरवठा योजना, स्वच्छता अभियान आणि प्रलंबित नगररचना प्रकल्पांकडे लक्ष वेधले. तळोदा शहराचा वाढता विस्तार लक्षात घेता आधुनिक सोयीसुविधांची गरज असल्याचे त्यांनी यावेळी पटवून दिले.

**निधीचा ओघ कायम राहणार**

नुकत्याच झालेल्या नगरपरिषद निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसने (अजित पवार गट) तळोद्यात घवघवीत यश मिळवत सत्ता काबीज केली आहे. या पार्श्वभूमीवर, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी नगराध्यक्षांना आश्वस्त केले की, तळोदा हे आमच्यासाठी महत्त्वाचे शहर असून, स्थानिक प्रशासनाने मांडलेले सर्व प्रस्ताव तातडीने मंजूर केले जातील.

शहराच्या विकासात आर्थिक अडचण येऊ दिली जाणार नाही. लोकप्रतिनिधींची उपस्थिती या महत्त्वपूर्ण भेटीवेळी नगराध्यक्षांसोबत त्यांचे पती तथा पॅनल प्रमुख योगेश चौधरी, शहादा येथील नगराध्यक्ष अभिजीत पाटील हे देखील यावेळी उपस्थित होते.

विकासाचा रोडमॅप आणि निधीचे आश्वासन शहराच्या विकासासाठी काल मुंबई येथे उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांची भेट घेऊन चर्चा केली. विशेष म्हणजे, या चर्चेदरम्यान सुनेत्रा पवार यांनी आपल्याला खांद्याला खांदा लावून तळोद्याच्या विकासासाठी काम करायचे आहे व शहराच्या विकासासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही, असा शब्द त्यांनी दिला आहे. तळोदा लोकनियुक्त नगराध्यक्षा भाग्यश्री चौधरी यांनी शहरातील रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता आणि अन्य पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणासाठी विशेष निधीची मागणी केली. त्यावर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार म्हणाल्या की, तळोदा शहराचा विकास ही आमची प्राथमिकता आहे. नगरपरिषदेने मांडलेल्या विकास आराखड्याला शासन पूर्ण सहकार्य करेल. निधीच्या अभावामुळे कोणतेही काम थांबणार नाही याची जबाबदारी माझी आहे,असेही लोकनियुक्त नगराध्यक्षा भाग्यश्री चौधरी यांनी सांगितले.

**नगराध्यक्षांनी दाखवलेल्या या तत्परतेमुळे तळोदा शहरात येत्या काळात मोठ्या प्रमाणावर विकासकामे मार्गी लागण्याची चिन्हे दिसत आहेत. या आश्वासनामुळे तळोदेकर नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले असून रखडलेल्या विकासकामांना आता नवी गती मिळणार आहे.**

## स्वनिर्मित बनविलेल्या वस्तूंचे आज प्रदर्शन

प्रतिनिधी । जळगाव

**येथील डॉ. वर्षा पाटील वुमन्स कॉलेज ऑफ होम सायन्स महाविद्यालयात १३ मार्च रोजी विद्यार्थिनींनी बनविलेल्या स्वनिर्मित वस्तूंचे प्रदर्शन व विक्री ठेवण्यात आलेले आहे.**

या प्रदर्शनात बांधणी साडी, दुपट्टे, पर्स बॅग, स्केचिंग केलेल्या बॅग विविध प्रकारचे वन पीस ड्रेस घागरे, पेंटिंग, फॅब्रिक पेंटिंग, मेहंदी, नेल आर्ट, सौंदर्य प्रसाधने, मायक्रम वस्तू, आरीवर्क, ब्लाऊज, एम्ब्रॉयडरी रुमाल, ग्रीटिंग्स, फोटो फ्रेम, रंगोली ज्वेलरी व हाताने बनवलेल्या ज्वेलरी किट यासह विविध प्रकारचे खाद्यपदार्थ व मुखवास आहेत. या प्रदर्शनाचे प्रमुख पाहुणे डॉ.उल्हास पाटील, डॉ. वर्षा पाटील आणि डॉ. प्रशांत वारके आहेत. या प्रदर्शनाचे आयोजन कॉलेजच्या प्राचार्या प्रा. कविता देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली केले गेले आहे. यासाठी मीनल राणे, कविता भोरटके, जयश्री कुलकर्णी, हिमानी जमाले, शुभांगी पाटील यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# नांद्रा येथील शेतकऱ्याचा दोन एकर गहू जळून खाक

## नुकसान भरपाई मिळण्याची मागणी

प्रतिनिधी । पाचोरा

**तालुक्यातील नांद्रा येथील शेतकऱ्याने महावितरणच्या कर्मचाऱ्यांना वेळोवेळी तक्रार करूनही वीज वितरण अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्याने अल्पभूधारक शेतकऱ्याचा दोन एकर पिकाचे २५ पोते गहू जळून खाक झाला आहे.**



नांद्रा शिवारातील शेतकरी राहुल देविदास पाटील यांच्या मालकीच्या गट नंबर २७८/२/१ या शेतात महावितरणचे विद्युत वाहक तार गेलेले आहेत. ते तार जीर्ण झाल्याने ते शेतात लोंबकळत असून शेतकऱ्याने या समस्येविषयी महावितरणकडे तक्रार करूनही संबंधित विभागाच्या दुर्लक्षामुळे काढणीला आलेला गहू पिकाचे दोन एकर मधील सर्व गहू जळून खाक झाले आहे. अंदाजे २५ पोते येणाऱ्या गव्हाचे मोठे नुकसान झाले. घटनास्थळी कार्यकारी अभियंता, लाईनमन इतर कर्मचाऱ्यांनी भेट दिली. यावेळी अल्पभूधारक शेतकऱ्याने नुकसान भरपाईची मागणी केली आहे.

# शिरपूरच्या आर.सी.पटेल प्राथमिक विद्यालयाला ए प्लस श्रेणी प्राप्त

प्रतिनिधी । शिरपूर



**शहरातील क्रांतीनगर येथील आर.सी. पटेल प्राथमिक विद्यालयाला शाळा गुणवत्ता मूल्यांकन व आश्वासन आराखडा अंतर्गत ए प्लस श्रेणी प्राप्त झाली आहे. शाळेने अंतर्गत मूल्यांकनात विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रमांचे आयोजन केले होते.**

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे एस.सी. ई.आर.टी. मार्फत शाळांचे स्वयं मूल्यांकन व त्यानंतर बाह्य मूल्यांकन करण्यात आले. राज्यातील ४२९ शाळांना ए प्लस श्रेणी प्राप्त झाली. यात आर. सी. पटेल प्राथमिक शाळा क्रांतीनगर शाळेचा समावेश आहे. शाळेतील विद्यार्थ्यांचे विविध उपक्रमातील सहभाग, शिक्षकांचे विद्यार्थ्यांप्रती परिश्रमाची तयारी यामुळेच शाळेला ए प्लस श्रेणी प्राप्त झाल्याने पालकांनी समाधान व्यक्त केले. या यशाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष आ.अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, सचिव रेषा पटेल, सीईओ डॉ. उमेश शर्मा, पी.व्ही.पाटील, मुख्याध्यापक सी.डी.पाटील आदींनी आनंद व्यक्त केला.

## पान १ वरुन

**विधानभवनासह चार......**

म्हणाले आहेत. शेअर बाजार, उच्च न्यायालय, मेट्रो आणि बँक उडवून देण्याची धमकी मेलद्वारे देण्यात आली आहे. आज सकाळी ६ वाजून ५७ मिनिटांनी धमकीचा मेल आला होता, असे देखील राम शिंदे म्हणाले. यानंतर उबाठा गटाचे आमदार मिलिंद नार्वेकर यांनी तपास करून अधिवेशनाचा कालावधी एक दिवस वाढवावा, अशी विनंती केली आहे, तर आमदार रोहित पवार यांनी सखोल तपास करण्याची मागणी केली आहे.

**केळी पीकविमा घोटाळा......**

या कालावधीत करण्यात आलेल्या तांत्रिक तपासणीत जळगाव जिल्ह्यातील सुमारे २८ हजार ४७५ हेक्टर क्षेत्रावर प्रत्यक्षात केळीची लागवडच नसल्याचे स्पष्ट झाले होते. मात्र, या क्षेत्रावर २७ हजार ४१९ शेतकऱ्यांनी केळी लागवड असल्याचे दाखवत पीक विमा काढल्याचे निदर्शनास आले. तसेच सुमारे १७ हजार हेक्टर क्षेत्रावरील एकाच शेतजमिनीवर चार ते पाच शेतकऱ्यांनी विमा घेतल्याचा संशय व्यक्त करण्यात आला. या प्रकरणात आणखी २९ हजार शेतकरी संशयाच्या फेऱ्यात सापडले आहेत. एकूण मिळून ५५ हजारांहून अधिक शेतकऱ्यांना प्रशासनाने मोबाइलवर नोटिसा पाठवून सात दिवसांत खुलासा करण्याचे आदेश दिले आहेत.

**उष्णतेच्या लाटेसोबतच......**

इशारा दिला. भर उन्हाळ्यात आता हवामान खात्याने अवकाळी पावसाचा इशारा दिला आहे. डिसेंबर, जानेवारी आणि फेब्रुवारी महिन्यात कमी अधिक प्रमाणात पाऊस होताना दिसला. त्यामध्येच आता पुन्हा एकदा पावसाचा मोठा इशारा वर्तवण्यात आला आहे. काही दिवसांपूर्वीच राज्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे रब्बी पिकाचे मोठे नुकसान झाले होते. त्यामध्येच आता पुन्हा एकदा पावसाचा अंदाज वर्तवण्यात आल्याने शेतकरी चिंतेत आहे. या जिल्ह्यात पाऊस होणार - शुक्रवार आणि शनिवारी (१३, १४ मार्च) विदर्भासह मराठवाड्यात वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. १३ मार्च रोजी यवतमाळ आणि चंद्रपूर जिल्ह्याला पावसाचा येलो अलर्ट दिला आहे. तर १४ मार्च रोजी, नागपूर, वर्धा, यवतमाळ, चंद्रपूर या जिल्ह्यांना पावसाचे येलो अलर्ट देण्यात आलेत.

**राज्यात गॅसचा तुटवडा......**

शहरी भागातील ग्राहकांकडे २५ दिवसांनी नियमित पुरवठा केला जाणार आहे. विविध जिल्ह्यातील तहसीलदार कार्यालयाकडून काळाबाजार रोखण्यासाठी विशेष पथकाची नेमणूक करण्यात आली असून ग्राहकांची कनेक्शन संख्या, सिलिंडर संख्या आदींची तपासणी केली जात आहे.

**धुळे येथील पिता......**

परिस्थितीजन्य पुरावे, नोंदविण्यात आलेल्या साक्ष, अशा सगळ्याच पातळीवरील नोंदी घेतल्यावर न्यायालय विशिष्ट निष्कर्षाला आले आणि १३ आरोपींपैकी ११ आरोपींना जन्मठेपेची शिक्षा सुनावली. धुळे न्यायालयात गुरुवारी या खटल्याचा निकाल असल्याने नातेवाईकांसह नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. दुपारी साडेतीन वाजता न्यायालयीन कामकाजाला सुरुवात झाली. सर्व आरोपींना न्यायाधीशांसमोर उभे करण्यात आले. त्यानंतर जिल्हा व सत्र न्यायाधीश जयश्री पुलाटे यांनी माजी नगराध्यक्ष बाजीराव ऊर्फ सुभाष सजन पवार, गौरव बाजीराव पवार, भूपेश वाल्मिक पाटील, हर्षल ऊर्फ दादू रविंद्र पाटील, जयराज शामकांत पाटील, ऋषिकेश शामकांत पाटील, दर्शन अंबादास परदेशी, भगवान नानाभाऊ अहिरे, अर्जुन ऊर्फ आप्पा भगवान अहिरे, भूषण बाबुराव कापकर आणि भूषण निंबा पगारे या ११ आरोपींना भादवि ३०२ अन्वये दुहेरी जन्मठेपेची शिक्षा ठोठावली. तर तर संदीप ऊर्फ विक्की दिलीप वेळीस यास भा.दं.वि. कलम २१२ अंतर्गत पाच वर्षाची शिक्षा सुनावली. आरोपी संदीप वेळीस हा गेल्या साडेसात वर्षापासून तुरुंगात असल्याने त्याने पाच वर्षपेक्षा अधिक शिक्षा भोगली आहे.

**भारताकडे पुरेसा......**

होतो आहे. कॅनडा, नॉर्वे, रशिया यांच्याकडून आपण कच्चं तेल घेत आहोत. एलपीजीचं उत्पादन २८ टक्के वाढलं आहे. फ्युएल चॅनल्सचे इतर पर्याय उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. दीर्घ काळ अशा प्रकारच्या स्थितीला तोंड द्यायला आपला देश तयार आहे. तीन मंत्र्यांची एक समिती स्थापन करण्यात आली आहे जी इराण, इस्रायल युद्धस्थिती आणि इंधनाची लागणारी आवश्यकता यावर लक्ष ठेवून आहे. अशी माहिती हरदीप पुरी यांनी दिली. दरम्यान हरदीप पुरी बोलत असताना पूर्ण वेळ विरोधी पक्षाचे खासदार कौन आया कौन आया एपस्टिन का दोस्त आया अशा घोषणा देत होते.

## महात्मा फुले हायस्कूल येथे ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले यांना अभिवादन

प्रतिनिधी । धरणगाव

**शहरातील सुवर्ण महोत्सवी, महात्मा फुले हायस्कूल येथे क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन करण्यात आले.**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक जे. एस. पवार होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व्ही.टी.माळी यांनी केले. यावेळी बोलताना मुख्याध्यापक पवार यांनी सांगितले की, महात्मा जोतिराव फुले व सावित्रीमाई फुले या फुले दाम्पत्याने शिक्षणाच्या माध्यमातून समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा व गुलामगिरी दूर करण्यासाठी मोलाचे कार्य केले. त्यांनी शिक्षणाची ज्योत प्रज्वलित करून समाजाला समानता, स्वाभिमान आणि प्रगतीचा मार्ग दाखविला. यावेळी एच. डी. माळी यांनी सावित्रीमाई फुले यांच्या जीवनकार्याचा आढावा घेत त्यांच्या सामाजिक व शैक्षणिक योगदानाची माहिती दिली. तसेच सध्या दूरदर्शनवर सुरू असलेली 'ज्ञानज्योती सावित्रीबाई जोतिराव फुले' ही मालिका सर्वांनी पाहून खरा इतिहास जाणून घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार पी. डी. पाटील यांनी मानले.

## अखिल भारतीय ग्राहक पंचायततर्फे आगार प्रमुखांना निवेदन

प्रतिनिधी । पाचोरा





अखिल भारतीय ग्राहक पंचायततर्फे विविध मागण्यांचे निवेदन आगार प्रमुख प्रकाश पाटील यांना दिले.

अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे प्रांतसचिव डॉ. अनिल देशमुख यांचे मार्गदर्शनात पाचोरा एसटी डेपोमध्ये प्रवाशी सोय, सुविधा, सवलती, बंद असलेली पाणपोई सुरू करणे, डेपोमध्ये सर्वत्र पुरेशी वीज आणि पंखे व्यवस्था, महिला प्रवाशांच्या अंगावरील सोनेचोरी, पॉकेटमारी सारख्या वाढत्या चोऱ्या रोखण्यासाठी सीसीटिव्हीची संख्या वाढविणे, आगार परिसरात सुशोभीकरण स्वच्छता, पार्किंग सुविधा, लांब पल्ल्याच्या बसेसमध्ये वाढ करणे, ज्येष्ठ नागरिक, पुरुष महिला, अपंग व्यक्ती, शालेय विद्यार्थासाठी वेळेवर बस सुविधा सवलती, महिला, मुलींना हाप तिकिटकार्ड, यासह अमृत योजनेतील पंच्याहत्तरी ओलांडलेले नागरिकांना मोफत प्रवासाच्या पासेस वेळेवर उपलब्ध करून देण्यात यावे. नव्याने आलेल्या नियमातील एनसीएमसी कार्ड शासनाने ठरवून आणि निश्चित केलेल्या रकमेतच डेपोत आणि ठराविक ठिकाणी परवानगी दिलेल्या केंद्रांवर जादा रक्कम न घेता नियमात देणे, अधिकृत पत्रकारांना प्रवासात तिकीट दरात काही प्रमाणात सूट देण्यात यावी. अशा विविध मागण्यांचे निवेदन आगार प्रमुख प्रकाश पाटील यांना दि. ९ मार्च रोजी परिवहन समितीचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण सूर्यवंशी, तालुका परिवहन समिती तालुकाध्यक्ष सुरेश तांबे, अ.भा. ग्राहक पंचायतचे तालुकाध्यक्ष संजय पाटील यांनी दिले. जिल्हा स्तरावर मागण्या पोहोचवून पाठपुरावा करण्याच्या सूचना ग्राहक पंचायतचे पदाधिकारी यांनी केल्या.

# गांधी विचार संस्कार परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

प्रतिनिधी । जळगाव

**विवेकानंद प्रतिष्ठान प्राथमिक शाळा वाघ नगर शाळेत गांधी विचार संस्कार परीक्षेत सहा विद्यार्थ्यांनी जिल्हा पातळीवर द्वितीय व तृतीय क्रमांकाने घवघवीत यश संपादन केले. त्या विद्यार्थ्यांना शाळेचे मुख्याध्यापक हेमराज आधार पाटील, समन्वयक सचिन गायकवाड यांच्या हस्ते व मेडल व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.**



गांधी विचार संस्कार परीक्षेत ज्ञानाई राजेंद्र पाटील सहावी-द्वितीय, तेजल विनोद नाथजोगी सहावी- द्वितीय, ग्यानदा चेतन मुथा सातवी-द्वितीय, लोखंडे प्रतीक शिवाजी पाचवी- तृतीय, अंशिका रंगलाल चव्हाण, सहावी- तृतीय, ग्रीष्मा नितीन रामकुवर सातवी- तृतीय. यांना सिल्व्हर, कांस्य मेडल व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. तसेच शाळेसाठी गांधी रिसर्च फाऊंडेशन जळगाव यांचेकडून ट्रॉफी देण्यात आली. त्याचा स्वीकार मुख्याध्यापक हेमराज पाटील यांनी केला. गांधी रिसर्च फाऊंडेशन जळगाव अंतर्गत गांधी विचार संस्कार परीक्षा संपूर्ण महाराष्ट्रभर घेतली जाते. या वर्षी या परीक्षेत इयत्ता ५ वी ते १० वी. या वर्गातील एकूण १७८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. गांधीजींचे विचार व गांधींविषयी आवड निर्माण व्हावी, यासाठीही परीक्षा घेतली जाते. या परीक्षेचे समन्वयक म्हणून सचिन गायकवाड, तेजस्वी सोनावणे यांनी परीक्षेचे नियोजन केले.

या कार्यक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक हेमराज पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच गांधी रिसर्च फाऊंडेशन मार्फत गिरीष कुळकर्णी, चंद्रशेखर पाटील, विश्वजीत पाटील तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य मिळाले.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी (मोबा.- ९९७००५३०६६) व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✲ कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी (✲ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# गॅस सिलिंडरची साठेबाजी करणाऱ्यांवर आता थेट गुन्हे दाखल

## जिल्हाधिकारी रोहन घुगे यांचा इशारा ; विशेष भरारी पथकांची राहणार करडी नजर !

प्रतिनिधी । जळगाव

**जिल्ह्यात घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरचा व्यावसायिक वापर आणि काळाबाजार रोखण्यासाठी जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी विशेष भरारी पथके स्थापन केली आहेत. हॉटेल्स आणि ढाब्यांवर होणाऱ्या अवैध वापरासह साठेबाजी करणाऱ्यांवर आता थेट गुन्हे दाखल होणार आहेत.**

पश्चिम आशिया देशांमधील युद्धजन्य परिस्थितीमुळे देशभरात इंधन पुरवठा साखळीवर ताण निर्माणाची शक्यता व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर, जळगाव जिल्ह्यातही घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरची संभाव्य टंचाई निर्माण होऊ नये. तसेच नागरिकांना नियमित आणि सुरळीत पुरवठा मिळावा, यासाठी जिल्हा प्रशासनाने प्रतिबंधात्मक उपाययोजना सुरू केल्या आहेत. घरगुती गॅसचा काळाबाजार आणि अवैध वापर रोखण्यासाठी विशेष भरारी पथके कडक नजर ठेवणार आहेत. जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्या आदेशानुसार घरगुती गॅस सिलेंडरचा अवैध वापर, साठेबाजी आणि काळाबाजार रोखण्यासाठी जिल्ह्यात विशेष भरारी पथकाची स्थापना करण्यात आली आहे. या पथकाच्या माध्यमातून जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये अचानक तपासण्या करून परिस्थितीवर लक्ष ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.




घरगुती वापरासाठी असलेले गॅस सिलिंडर काही ठिकाणी व्यावसायिक कारणांसाठी वापरले जात असल्याच्या तसेच साठेबाजी करून कृत्रिम टंचाई निर्माण केली जात असल्याच्या तक्रारी प्रशासनाकडे प्राप्त होत आहेत. या पार्श्वभूमीवर, कठोर कारवाई करण्यासाठी हे पथक सक्रिय करण्यात आले आहे.

या सर्व अधिकाऱ्यांच्या समन्वयातून जिल्हाभर तपासणी मोहीम राबविण्यात येणार आहे. हे पथक गॅस एजन्सी, गोदामे, हॉटेल्स, ढाबे, व्यावसायिक आस्थापना, औद्योगिक युनिट्स तसेच संशयित ठिकाणी अचानक भेट देऊन तपासणी करणार आहे. घरगुती गॅस सिलिंडरचा व्यावसायिक वापर, अवैध साठेबाजी, अनधिकृत विक्री किंवा काळाबाजार आढळल्यास संबंधितांवर आवश्यक त्या कायदेशीर तरतुदीनुसार कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. आवश्यक असल्यास परवाने निलंबित करणे, दंडात्मक कारवाई करणे किंवा गुन्हे दाखल करण्याचीही कारवाई केली जाऊ शकते. ई-मेल, दूरध्वनी क्रमांकावर तक्रारीची सोय करण्यात आली असून नागरिकांनीही जिल्हा प्रशासनाच्या या मोहिमेला सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

घरगुती गॅस सिलिंडरचा योग्य वापर करावा, अनावश्यक साठा करू नये. तसेच कुठेही गॅसचा अवैध वापर किंवा काळाबाजार होत असल्याचे आढळल्यास तात्काळ प्रशासनाला कळवावे, असेही आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे. नागरिकांना घरगुती गॅस पुरवठ्याबाबत काही अडचणी, तक्रारी किंवा संशयास्पद प्रकार आढळल्यास त्या प्रशासनापर्यंत पोहोचवण्यासाठी हेल्पलाईन सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. यासाठी ०२५७-२२२३१८० या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा किंवा dsojalgaon1gmail.com ई-मेलवर तक्रार नोंदवावी. जिल्ह्यात घरगुती गॅसचा पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी प्रशासनाकडून सतत परिस्थितीचा आढावा घेतला जात असून, नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये यासाठी आवश्यक ती सर्व पावले उचलली जात असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली.

### यांचा आहे पथकात समावेश

**भरारी पथकात संबंधित तालुक्यांचे तहसीलदार, पोलीस निरीक्षक तसेच उपनिरीक्षक, जिल्हा पुरवठा विभागाचे निरीक्षण अधिकारी आणि पुरवठा निरीक्षक यांचा समावेश करण्यात आला आहे. याशिवाय भारत पेट्रोलियम (बीपीसीएल), हिंदुस्तान पेट्रोलियम (एचपीसीएल) आणि इंडियन ऑईल कॉर्पोरेशन (आयओसीएल) या प्रमुख तेल कंपन्यांचे विक्री अधिकारीही या पथकात सहभागी असणार आहेत. दोषींवर थेट गुन्हे दाखल करण्याचे निर्देश जिल्हा प्रशासनाने दिले आहे.**

## थोडक्यात

### एक मूठ पक्षांसाठीतून दिला पर्यावरण संवर्धनाचा संदेश

**जळगाव ।** पक्ष्यांप्रती प्रेम आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा एक आगळावेगळा उपक्रम संत ज्ञानेश्वर विद्यालय येथे राबविण्यात आला. एक मूठ पक्षांसाठी या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी घरातून एक मूठ धान्य आणून शाळेच्या आवारात ठेवलेल्या दाणापात्रात टाकले. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर पक्ष्यांसाठी पाण्याचीही व्यवस्था करण्यात आली. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत पर्यावरण संरक्षणाची जबाबदारी प्रत्यक्ष कृतीतून पार पाडली. मुख्याध्यापक मुकेश नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला. उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये दयाभाव, संवेदनशीलता आणि सामाजिक जाणीव अधिक दृढ होत असल्याचे मत शिक्षकांनी व्यक्त केले.

### संत बाबा गेलाराम साहेब यांचा जन्मोत्सव साजरा

**जळगाव ।** येथील पूज्य सेवा मंडळात संत बाबा गेलाराम साहिब यांचा ९६ वा वाढदिवस मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला. पहाटे ५ वाजता पंचामृत अभिषेक करून समारंभाची सुरुवात झाली. जळगाव आणि देशभरातील इतर अनेक शहरांमधील ८७ मुलांनी सामूहिक जनेऊ संस्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. हा शुभ प्रसंग भव्य मिरवणुकीने मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. अमर शहीद संत कंवरराम ट्रस्टने पवित्र सामुहिक जनेऊ समारंभात सहभागी होणाऱ्या सर्व मुलांसाठी मोफत कपडे, चप्पल आणि राहण्याची व्यवस्था केली. संध्याकाळी बाबांच्या नावाने संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

### पारोळा येथे महिला दिन साजरा

**पारोळा ।** येथील एम.यु.करोडपती इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये जागतिक महिला दिवस विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष यू.एच. करोडपती होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव डॉ. सचिन करोडपती, संचालक डॉ. चेतन करोडपती, संचालिका मंगला करोडपती, सदस्या राधिका करोडपती, प्राचार्या स्वाती बलखंडे उपस्थित होते. यावेळी सचिव डॉ. सचिन करोडपती यांनी महिला सक्षमता व सामाजिक कार्य यावर विचार मांडले. सदस्या राधिका करोडपती यांनी महिला दिवस हा केवळ उत्सव नसून महिलांच्या संघर्ष, त्याग आणि यशाचा गौरव करण्याचा दिवस आहे असे सांगितले. प्राचार्या स्वाती बलखंडे यांनी महिलांचे समाजातील योगदान अधोरेखित केले.

### एलपीजी गॅस भरण्यासाठी रिक्षांची लागलेली लांबलचक रांग



*जळगाव - शहरात एलपीजी गॅसचा तीव्र तुटवडा निर्माण झाल्याने शहरातील सुरू असलेल्या एकमेव पंपावर रिक्षांची किलोमीटरभर रांग लागली होती.*

## रोटरी कम्युनिटी कॉर्प्स ऑफ राईपतर्फे आज व्याख्यान

प्रतिनिधी । जळगाव

येथील रोटरी क्लब जळगाव पुरस्कृत रोटरी कम्युनिटी कॉर्प्स ऑफ राईपतर्फे शुक्रवार, दि. १३ मार्च रोजी संध्याकाळी ४ वाजता गणपती नगरातील रोटरी सभागृहात महिला अधिकार विषयावर श्रद्धा रेखा राजेंद्र यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमास अॅड. रुपाली भोकरीकर यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. खास महिलादिनानिमित्त महिलांसाठी आयोजित कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन अध्यक्षा पल्लवी शिंपी व मानद सचिव योगिता पाटील यांनी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

श्रद्धा रेखा राजेंद्र यांनी पुणे येथील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमधून इन्स्ट्रुमेंटेशन अँड कंट्रोल या विषयात बी.टेक. पदवी प्राप्त केली असून गेली ११ वर्षे कॉर्पोरेट क्षेत्रात कार्यरत आहेत. सध्या मॉडर्ना फार्मास्युटिकल्स कॉर्पोरेशन येथे कार्यरत आहेत. त्या गेल्या १५ वर्षांपासून विविध सामाजिक विषयांवर सक्रियपणे समाजकार्य करत आहेत. राणी लक्ष्मीबाई ब्रिगेड या मुलींना स्वसंरक्षण प्रशिक्षण देणाऱ्या महिलांच्या गटात स्वसंरक्षण प्रशिक्षक म्हणूनही त्या कार्यरत आहेत. आजपर्यंत विविध सामाजिक विषयांवर १०,००० पेक्षा अधिक विद्यार्थी, महिला आणि सामान्य नागरिकांसाठी त्यांनी व्याख्याने दिली आहेत. संविधान जागर अभियानाचे काम त्या महाराष्ट्रभर करत आहे.

## विद्यार्थ्यांच्या भावी जीवनाच्या विकासासाठी प्रशिक्षण उपयुक्त ठरणार

### प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटनप्रसंगी गटशिक्षणाधिकारी विजय पवार यांचे मत



प्रतिनिधी । पाचोरा

**इयत्ता नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांच्या भावी जीवनातील विकासासाठी सदर प्रशिक्षण उपयुक्त ठरणार असल्याचे प्रतिपादन गटशिक्षणाधिकारी विजय पवार यांनी केले.**

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डायट) जळगाव आणि पंचायत समिती शिक्षण विभाग पाचोरातर्फे तालुकास्तरीय व्यावसायिक शिक्षण व उद्योजकता या विषयावर दोन दिवसीय प्रशिक्षण घेण्यात आले. गटशिक्षणाधिकारी विजय पवार यांनी प्रशिक्षण वर्गाचे उदघाटन केले. त्यावेळी ते बोलत होते. प्रशिक्षणाला तालुक्यातील सर्व माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक व एक सहशिक्षक उपस्थित होते. मुख्याध्यापकांनी माजी विद्यार्थी संघ, पालक शिक्षक संघ यांच्या सहकार्याने व्यावसायिक शिक्षण व उद्योजकता या संदर्भात विविध उपक्रम शाळेत घेण्याचे आवाहन यांप्रसंगी करण्यात आले.या प्रशिक्षण समन्वयक म्हणून शिक्षण विस्तार अधिकारी सरोज गायकवाड यांनी काम पाहिले. तज्ञ मार्गदर्शक म्हणून रवींद्र चौधरी नवजीवन विद्यालय व मच्छिन्द्र कोळी वरखेडी विद्यालय यांनी दोन दिवस मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिलीप सोनवणे यांनी केले. आभार संजू राठोड यांनी मानले. प्रशिक्षण यशस्वीतेसाठी विशेष शिक्षक लहू पवार, मुख्याध्यापक संघांचे अध्यक्ष किरण पाटील, मुख्याध्यापक शिवाजी शिंदे, मुख्याध्यापक समाधान महाजन, मुख्याध्यापक समाधान पाटील,विषयतज्ञ गिरीश भोयर, प्रा.जे. व्ही पाटील, रावसाहेब साळुंखे, जयदीप पाटील यांनी सहकार्य केले.

### फर्निचरचे दुकान फोडले ; ५० हजारांचा माल लंपास

प्रतिनिधी । जळगाव

शहरातील जिल्हापेठ पोलीस स्टेशनच्या हद्दीतील एका फर्निचरच्या दुकानाचे शटर तोडून चोरट्यांनी ५० हजार रुपयांचा मुद्देमाल लांबवल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शहरातील पोलीस लाईन समोरील हर्षल एजन्सी नावाचे फर्निचरचे दुकान निळकंठ आनंदा नारखेडे (वय ५९, रा. नंदनवन कॉलनी) यांच्या मालकीचे आहे. १० मार्च रोजी रात्री ८ वाजेच्या सुमारास दुकान बंद केल्यानंतर, १० मार्च ते ११ मार्चच्या सकाळी ९:३० वाजेच्यादरम्यान अज्ञात चोरट्यांनी दुकानाचे लोखंडी शटरचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. चोरट्यांनी दुकानातून वस्तू आणि रोख रक्कम चोरून नेली आहे. यात ५ कुलर (किंमत २५,००० रुपये, निलकमल कंपनीची अॅल्युमिनियमची सीडी (किंमत ३,००० रुपये), रोख रक्कम एकूण २२,००० रुपये, असा एकूण ५०,००० रुपयांचा मुद्देमाल लंपास करण्यात आला आहे.

## सीमा भारंबे यांच्या साहित्याचा केला गौरव



प्रतिनिधी । भुसावळ

### भुसावळ नगरपरिषदेतर्फे जागतिक महिला दिनानिमित्त उपक्रम

**परदेशात एखाद्या साहित्यिक किंवा कलावंताच्या घरावर सांस्कृतिक वारसा म्हणून एक विशिष्ट निळ्या रंगाची पाटी लावली जाते. त्याचप्रमाणे भुसावळ नगर परिषदेतर्फे जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून संतोषी माता हॉलमध्ये झालेल्या कार्यक्रमात सांस्कृतिक वारसा चिन्हाचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते दि. ८ मार्च रोजी करण्यात आले.**

यांप्रसंगी भुसावळ शहराच्या प्रथम नागरिक स्वतः नगराध्यक्ष गायत्री भंगाळे, ललिता चौधरी यांनी डीएस हायस्कूलमधील शिक्षिका व साहित्यिक सीमा भारंबे यांच्या निवासस्थानी भेट देऊन सांस्कृतिक व साहित्याची ओळख म्हणून निळ्या रंगाची पाटी लावली. यांप्रसंगी शहरातील अनेक मान्यवर, प्रतिष्ठीत महिला या कार्यक्रमात सहभागी झाल्या होत्या. प्रा.उत्तम सुरवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम राबवण्यात आला.

शहरात लेखिका सीमा भारंबे यांच्या निवासस्थानाला प्रथमच महाराष्ट्रात सांस्कृतिक वारश्याचा दर्जा दिल्यामुळे जळगाव जिल्ह्यातील पत्रकार, कवी, लेखक व साहित्यिक मान्यवरांकडून साहित्यिक सीमा भारंबे यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## जैविक कृषी तंत्रज्ञानामुळे जोमदार पिके पाहून शेतकरी भारावले!

### निर्मल सीड्सच्या मेगा फील्ड डे ला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी । पाचोरा

**बी-बियाणे क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी म्हणून ओळख असलेल्या पाचोरा येथील निर्मल सिड्सतर्फे दि. १० मार्च रोजी आयोजित करण्यात आलेल्या मेगा फील्ड डे या कार्यक्रमाला जिल्ह्यासह परिसरातील हजारो शेतकरी बांधवांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. प्रगत शेतीचे जिवंत उदाहरण ठरलेल्या या 'क्रॉप शो 'ला सकाळपासूनच शेतकऱ्यांची मोठी गर्दी झाली होती.**



या क्रॉप शोमध्ये निर्मल सिड्सने विविध पिकांच्या उच्च उत्पादनक्षम वाणांचे भव्य प्रात्यक्षिक उभारले होते. यात भेंडी, टोमॅटो, वांगी, कारले, गिलकी, दोडके, भोपळा, टरबूज, खरबूज, काशीफळ, काकडी, टिंडा यांसारख्या भाजीपाला पिकांसह मका, ज्वारी, बाजरी, गहू, चारा पिके, मूग, उडीद, सोयाबीन आदी पिकांचा समावेश होता. या क्रॉप शो मध्ये विशेष बाब म्हणजे रासायनिक खतांचा वापर कमी करून निर्मल सीड्सच्या जैविक कृषी तंत्रज्ञानाच्या साहाय्याने काही पिके जोमदार व हिरवीगार उभी करण्यात आली होती. सशक्त वाढ, रोगमुक्त झाडे आणि फळांनी बहरलेली पिके पाहून उपस्थित शेतकरी अक्षरशः भारावून गेले. क्रॉप शोमध्ये उभ्या असलेल्या लदबद फळांनी आणि फुलांनी बहरलेल्या वाणांनी शेतकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले. अनेक शेतकऱ्यांनी पिकांची बारकाईने पाहणी करत कंपनीच्या तज्ज्ञांकडून लागवड तंत्रज्ञान, उत्पादन वाढवण्याच्या पद्धती आणि आधुनिक शेती व्यवस्थापनाची माहिती घेतली. निर्मल सिड्स ही कंपनी शेतकऱ्यांच्या गरजांवर आधारित संशोधनासाठी ओळखली जाते. कंपनीकडून ३५ पेक्षा अधिक पिकांमध्ये सातत्याने संशोधन केले जात असून भारतातील २२ राज्यांमध्ये कंपनीचे मार्केटिंग नेटवर्क विस्तारलेले आहे. उत्कृष्ट व नाविन्यपूर्ण संशोधनासाठी कंपनीला राष्ट्रीय स्तरावरील विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. क्रॉप शोमध्ये पाहिलेल्या पिकांची गुणवत्ता आणि उत्पादन क्षमता पाहून अनेक शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त करत येणाऱ्या हंगामामध्ये निर्मल सिड्सचेच बियाणे वापरणार , असा मनोदय त्यांनी व्यक्त केला.

## प्लेसमेंट माहितीपत्रकाचे कुलगुरूंच्या हस्ते अनावरण

प्रतिनिधी । जळगाव

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील व्यवस्थापन शास्त्र प्रशाळे अंतर्गत एमबीएच्या विद्यार्थ्यांसाठी तयार करण्यात आलेल्या प्लेसमेंट माहितीपत्रकाचे अनावरण आज कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांच्या हस्ते करण्यात आले. या माहितीपत्रकाच्या माध्यमातून एमबीएच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक व कौशल्यपूर्ण माहिती उद्योग क्षेत्रातील विविध कंपन्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.**

यावेळी बोलताना कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांनी विद्यार्थ्यांना आगामी प्लेसमेंट ड्राइव्हसाठी शुभेच्छा दिल्या. उद्योग क्षेत्रात अधिकाधिक संधी मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने तयारी करावी, तसेच कौशल्य विकासावर भर द्यावा, असे मार्गदर्शन त्यांनी केले. विद्यापीठातून तयार होणारे विद्यार्थी हे उद्योग क्षेत्राच्या अपेक्षा पूर्ण करणारे असावेत, असेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाला व्यवस्थापन शास्त्र प्रशाळेच्या संचालिका प्रा. मधुलिका सोनवणे, प्लेसमेंट समन्वयक प्रा. आर. आर. चव्हाण तसेच प्लेसमेंट सेलचे समिती सदस्य उपस्थित होते.

# चोपड्यात मालमत्ता करावरील व्याज, दंडावर अभय योजना

## ५०% तत्काळ सूट, उर्वरित ५०% सूट मंजुरीसाठी प्रस्ताव : मुख्याधिकारी रामनिवास झंवर

प्रतिनिधी । चोपडा

**नगरपरिषदेमार्फत शहरातील नागरिकांना दिलासा देण्यासाठी निवासी मालमत्ता करावरील व्याज व दंडावर विशेष 'अभय योजना' राबविण्यात येत आहे. ही योजना दि. २५ मार्च २०२६ पर्यंत लागू राहणार आहे.**

या योजनेंतर्गत निवासी मालमत्ताधारकांनी थकीत मालमत्ता कर व पाणीपट्टी कर एकरकमी भरल्यास, त्यांना मालमत्ता कराच्या थकबाकीवरील आकारण्यात आलेल्या व्याज व दंडावर ५० टक्के सूट तात्काळ देण्यात येणार आहे. तसेच उर्वरित ५० टक्के सूट मंजूर करण्यासाठी वरिष्ठ स्तरावर प्रस्ताव



सादर करण्यात येणार असल्याची माहिती मुख्याधिकारी रामनिवास झंवर यांनी आज येथे दिली आहे.

नगरपरिषदेच्या नोंदीनुसार अनेक निवासी मालमत्तांवर मागील कालावधीतील कराची थकबाकी प्रलंबित आहे. नागरिकांना आर्थिक दिलासा मिळावा व थकबाकी नियमित व्हावी यासाठी नगरपरिषदेच्या वतीने ही विशेष अभय योजना राबविण्यात येत आहे.

चोपडा नगरपरिषदेमार्फत शहरातील सर्व निवासी मालमत्ताधारकांना दि. २५ मार्च २०२६ पूर्वी थकीत मालमत्ता कर व पाणीपट्टी कर एकरकमी भरून मालमत्ता कराच्या थकबाकीवर आकारण्यात आलेल्या व्याज व दंडावरील अभय योजनेचा लाभ घ्यावा, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे

# शेतकऱ्यांच्या नुकसानीचा प्रश्न मांडला अधिवेशनात

प्रतिनिधी । फैजपूर



**सध्या सुरू असलेल्या राज्य विधिमंडळाच्या अधिवेशनात रावेर मतदारसंघाचे आ.अमोल जावळे यांनी वादळी पाऊस, गारपीट व जमीन खरडून झालेल्या शेती नुकसानीचा प्रश्न उपस्थित करत राज्य सरकारचे लक्ष वेधले.**

यासंदर्भात त्यांनी मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांना प्रश्न विचारत बाधित शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्याची मागणी केली. मे, जून व जुलै २०२३ दरम्यान झालेल्या वादळी पाऊस व गारपिटीमुळे मतदारसंघातील अनेक गावांमध्ये शेतीपिकांचे मोठ्याप्रमाणावर नुकसान झाले.

प्रशासनाने केलेल्या पंचनाम्यानुसार केळी, कापूस, ज्वारीसह विविध पिकांचे नुकसान झाले आहे. अनेक गावांतील शेतकरी व मोठ्या क्षेत्रावरील शेती बाधित झाली आहे. या नैसर्गिक आपत्तीनंतरही अनेक प्रकरणांमध्ये अंतिम अहवाल सादर न झाल्यामुळे सुमारे ३०९४ शेतकरी शासनाच्या मदतीपासून वंचित राहिल्याचे आमदार जावळे यांनी अधिवेशनात मांडले. त्यामुळे बाधित शेतकऱ्यांचा अंतिम अहवाल तातडीने सादर करून शासनाच्या नियमांनुसार त्यांना आर्थिक मदत मंजूर करावी, अशी मागणी त्यांनी केली. नैसर्गिक आपत्तीमुळे आधीच आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणीही आमदार जावळे यांनी यावेळी केली. या प्रश्नामुळे बाधित शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत मिळेल, अशी अपेक्षा शेतकरीवर्गातून व्यक्त होत आहे.

## थोडक्यात

### अमळनेर येथे महिलांचा गौरव

**अमळनेर ।** आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त येथे पारस गोल्ड सराफी पेढी, साने गुरुजी फाउंडेशन आणि उज्ज्वल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दुर्बल, वंचित, उपेक्षित तसेच एकल, विधवा व परित्यक्ता महिलांना 'श्यामची आई सन्मान' पुरस्काराने गौरविण्यात आले. आपल्या कष्ट, धैर्य आणि स्वाभिमानाच्या बळावर जीवनाशी झुंज देत कुटुंबाचा सांभाळ करणाऱ्या आणि विविध व्यवसायातून स्वतःचे स्थान निर्माण करणाऱ्या अमळनेर तालुक्यातील १७ महिलांचा सन्मानचिन्ह आणि 'श्यामची आई' पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन पारस गोल्डचे संचालक विनोद थोरात, साने गुरुजी फाउंडेशनचे अध्यक्ष नरेंद्र पाटील आणि उज्वल फाउंडेशनचे अध्यक्ष दिलीप पाटील यांनी केले होते.

### फैजपूर येथे महिला दिन साजरा

**फैजपूर ।** येथील पालिका सभागृहात जागतिक महिला दिनानिमित्त महिला बालकल्याण विभाग आणि डीएनयुएलएमच्या संयुक्त कार्यक्रमात सावित्रीबाई फुलेंच्या प्रतिमेला पुष्पहार नगराध्यक्ष दामिनी सराफ यांच्या हस्ते करण्यात आला .

कार्यक्रमात नगरसेविका अमिता चौधरी, सुनीता नेहेते, दीपाली भारंबे, नीलिमा महाजन, जयश्री चौधरी, भावना भारंबे, प्रियंका इंगळे, विद्या सरोदे आदींच्या उपस्थितीत महिला दिनाचे महत्व अधोरेखित केले गेले. कार्यक्रमाला असंख्य महिलांची उपस्थिती लाभली आणि विविध सामाजिक व शैक्षणिक विषयांवर मार्गदर्शन व संवाद साधला गेला.

# स्वच्छता कामगार हेच खरे आरोग्यदायी जीवनाचे हीरो : तहसीलदार महेंद्र सूर्यवंशी



प्रतिनिधी । धरणगाव

येथील कर्तव्य बहुउद्देशीय संस्था आणि नवनिर्वाचित नगरसेवक सुनील पंढरीनाथ चौधरी यांच्या संयुक्त विद्यमाने येथे संत गाडगेबाबा स्वच्छता कामगार पुरस्कार सोहळ्यात नगर परिषदेतील १० स्वच्छता कामगारांना उत्कृष्ट स्वच्छता कामगार पुरस्कार प्रदान करण्यात आला. याप्रसंगी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. संजीवकुमार सोनवणे तर प्रमुख अतिथी म्हणून तहसीलदार महेंद्र सूर्यवंशी, मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. मिलिंद डहाळे, साहित्यिक बी. एन. चौधरी, गोदावरी फाउंडेशनच्या संचालिका डॉ. केतकी पाटील, शहर विकास आघाडीचे गटनेता निलेश चौधरी, प्रा. डॉ. कांचन महाजन, डॉ. रोहिणी शिंदे, श्रीजी जिनिंगचे संचालक नयन गुजराती, व्यापारी आघाडीचे अध्यक्ष संजय कोठारी, नगरसेवक सुनील चौधरी उपस्थित होते. भारत माता आणि गाडगेबाबा यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. तहसीलदार महेंद्र सूर्यवंशी यांनी स्वच्छतेचे काम करणारे कर्मचारी देशाचे खरे आरोग्यदूत असून त्यांच्यामुळे जीवन आरोग्यदायी राहत असल्याचा खुलासा केला.

अध्यक्षीय भाषणात या सर्व कर्मचाऱ्यांमुळेच गाडगे महाराजांची स्वच्छतेचे परंपरा अखंडीत सुरू राहिली. घर, गल्ली व गावाची स्वच्छता करता करता हे सर्व कर्मचारी मनाची सुद्धा स्वच्छता करत असल्याचे प्रतिपादन डॉ.संजीवकुमार सोनवणे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आर. डी. महाजन यांनी केले. प्रास्ताविक नगरसेवक सुनील चौधरी यांनी केले तर डी. के. चौधरी यांनी आभारप्रदर्शन केले. कार्यक्रम संपल्यानंतर सर्व कर्मचाऱ्यांनी भोजनाचा आस्वाद घेतला.

### यांना दिला स्वच्छता पुरस्कार

**अजय सोनवणे,चेतन पचेरवार, भगवान पारधी, हर्षल बत्तीस, विजय सोनवणे, सुखदेव वाघरे, पिंकी गोविंद बिवालकर, उषा अरुण सोनवणे, भारती संतोष वाघरे, सीमा भिकन मोरे.**

# नागलवाडी जि. प.केंद्र शाळेत महिला दिनानिमित्त विविध कार्यक्रम

प्रतिनिधी । चोपडा

**तालुक्यातील नागलवाडी येथील जि.प. केंद्र शाळेत जागतिक महिला दिनानिमित्त विविध कार्यक्रम साजरे करण्यात आले.**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्रप्रमुख देवेंद्र पाटील होते. तर यावेळी उपसरपंच सचिन पाटील, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मेघनाथ पाटील, वैशाली पवार, ग्रामपंचायत सदस्य श्रीकांत पाटील, अंगणवाडी सेविका, महिला, पालक,



प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमा पूजन, ईशस्तवन व स्वागत गीताने करण्यात आली. प्रास्ताविक मुख्याध्यापिका चित्रा पाटील यांनी केले. त्यानंतर आदर्श अंगणवाडी सेविका लता पाटील यांचा सत्कार करण्यात आला. इयत्ता चौथीच्या विद्यार्थिनींनी विविध क्षेत्रात यशस्वी महिलांची वेशभूषा करून आपले मनोगत सादर केले. शिवजयंतीनिमित्त समूह नृत्यात सहभागी विद्यार्थ्यांना बक्षीस म्हणून आकर्षक पॅडचे वाटप करून कौतुक करण्यात आले. महिला पालकांसाठी हळदी-कुंकू तसेच विविध स्पर्धांचे आयोजन करून बक्षीस वाटप करण्यात आले. सूत्रसंचालन दिगंबर पाटील यांनी तर यशस्वीतेसाठी राजेंद्र शिरसाट ,राहुल दाभाडे, सुजाता बोरसे, सोनाली साळुंखे, कल्पना पाटील ,वंदना बाविस्कर, स्वाती बाविस्कर या सर्व शिक्षकांनी मेहनत घेतली. वंदे मातरम् आणि आभाराने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

### भुसावळात विविध क्षेत्रातील महिलांचा सन्मान

प्रतिनिधी । भुसावळ

आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त भुसावळ उपविभागीय पोलीस कार्यालयात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांचा सन्मान सोहळा उत्साहात पार पडला. समाजाच्या विविध क्षेत्रातील महिलांच्या कामगिरीचा गौरव यावेळी करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन उपविभागीय पोलीस कार्यालयात करण्यात आले होते.

# पृथ्वीवर जन्मलेला प्रत्येक मनुष्य समान!



प्रतिनिधी । पाडळसे

**पृथ्वीवर जन्मलेला प्रत्येक मनुष्य समान आहे, तो त्याच्या कर्मान श्रेष्ठ ठरतो. शिवमहापुराण कथेच्या मंडपात कोणताही भेदभाव नसतो. येथे येणारा प्रत्येक भक्त केवळ शिवभक्त असतो, असे मार्मिक प्रतिपादन आंतरराष्ट्रीय कथाकार पंडित प्रदीप मिश्रा यांनी कथेच्या दुसऱ्या दिवशी केले.**

कथेतील महत्त्वपूर्ण विचार आणि संस्कार- हरी चंदन आणि शिवचंदन पंडितजींनी चंदनाचे महत्त्व विशद करताना सांगितले की, सुकलेल्या तुळशीपासून हरी चंदन तयार होते, तर बेलपत्रापासून शिवचंदन तयार होते.

या दोन्हीचे आध्यात्मिक महत्त्व अनन्यसाधारण आहे. नकारात्मकता टाळा प्रत्येक स्त्री-पुरुषाने स्वतः बद्दल नकारात्मक बोलणे टाळावे, कारण त्याचा शरीरावर वाईट परिणाम होतो. जेव्हा आपण स्वतःबद्दल सकारात्मक विचार करतो आणि बोलतो, तेव्हा जीवनात सकारात्मक बदल घडतात. समभाव आणि प्रेम एकत्र कुटुंबात सर्वांवर समभाव ठेवून प्रेम केल्यास मोठी पुण्यप्राप्ती होते, असेही त्यांनी आवर्जून सांगितले. शेगावच्या गजानन महाराजांच्या भंडाऱ्याचा गौरव कथेदरम्यान पंडितजींनी महाराष्ट्रातील संतांचा गौरव करताना सांगितले की, जगातील सर्वात मोठा भंडारा कुठे लागत असेल, तर तो शेगाव निवासी संत गजानन महाराज यांच्या मठात लागतो. तिथे अनेक वर्षांपासून अविरतपणे भक्तांचे पोट भरले जात आहे.

### प्रशासनाची सेवा

**कथास्थळी भाविकांची रेकॉर्ड ब्रेक गर्दी असूनही पोलीस प्रशासन, आरोग्य कर्मचारी, एस.टी. महामंडळ आणि वीज वितरण कंपनीचे कर्मचारी जि.प., पं.स.अधिकारी, कर्मचारी अहोरात्र सेवा बजावत आहेत. १५ मार्चपासून मध्य प्रदेशातील कुबेरेश्वर धाम (सिहोर) येथे रुद्राक्ष सोहळा सुरू होणार असल्याची माहितीही पंडितजींनी यावेळी दिली.**

# रसलपूर येथे गोमांस विक्रीवर पोलिसांची धाड

## १७५ किलो मांस जप्त, दोघांना अटक

प्रतिनिधी । रावेर

**तालुक्यातील रसलपुर गावातील कुरेशी मोहल्ला परिसरात गोवंशाची कत्तल करून गोमांस विक्री केली जात असल्याची गुप्त माहिती मिळाल्यानंतर रावेर पोलिस स्टेशनच्या गुन्हे शोध पथकाने मंगळवारी सकाळी धाड टाकून मोठी कारवाई केली. या कारवाईत अंदाजे १३० किलो गोमांस व धारदार शस्त्रे जप्त करण्यात आली असून पिता-पुत्रास अटक करण्यात आली आहे, तर एक आरोपी फरार झाला आहे.**

पोलिसांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की रसलपूरच्या कुरेशी मोहल्ल्यात गोवंशाची कत्तल करून गोमांस विक्री करत आहेत. या माहितीच्या आधारे गुन्हे शोध पथकाने संबंधित ठिकाणी छापा टाकला. यात शेख युसुफ शेख अय्युब कुरेशी (वय ५०) आणि शेख सानिफ शेख युसुफ कुरेशी (वय २५) हे पिता-पुत्र गोवंश जातीच्या जनावरांचे मांस कापून विक्री करताना आढळून आले. पोलिसांना पाहताच त्यांनी पळून जाण्याचा प्रयत्न केला; मात्र पोलिसांनी पाठलाग करून त्यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून सुमारे १३० किलो गोमांस (अंदाजे किंमत २६ हजार



रुपये) तसेच धारदार कोयता जप्त करण्यात आला. शेख नुरा शेख मुनीर यांच्या घराजवळील पत्र्याच्या शेडमध्ये शेख नईम शेख अय्युब कुरेशी हा गोवंशाची कत्तल करून मांस विक्री करताना आढळून आला.

# गॅस तुटवड्याने जिल्ह्यातील हॉटेल व्यवसायावर परिणाम

## पुरवठा न झाल्यास ३ ते ४ दिवसांत सेवा ठप्प होण्याची शक्यता

प्रतिनिधी । जळगाव

**अमेरिका, इस्त्रायल- इराण दरम्यान निर्माण झालेल्या आंतरराष्ट्रीय युद्धजन्य परिस्थितीचे तीव्र पडसाद आता स्थानिक स्तरावर, विशेषतः जळगाव जिल्ह्यातील हॉटेल व्यवसायावर उमटू लागले आहेत. जागतिक घडामोडींमुळे व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या पुरवठा साखळीवर विपरीत परिणाम झाला आहे.**

जळगाव शहर आणि जिल्ह्यात गॅसचा अभूतपूर्व तुटवडा निर्माण झाला आहे. शहरातील प्रमुख वितरकांकडे सध्या



अत्यंत मर्यादित साठा आहे. परिस्थिती अशीच राहिल्यास येत्या ३ ते ४ दिवसांत गॅसअभावी अनेक हॉटेल्सच्या शेगड्या विझण्याची भीती व्यक्त होत आहे.

जिल्ह्यात सुमारे ३००० हून अधिक हॉटेल्स पूर्णपणे व्यावसायिक गॅसवर अवलंबून आहेत. पुरवठा खंडित झाल्याने या व्यावसायिकांसमोर मोठे संकट उभे ठाकले आहे. अनेकांनी गॅस वाचवण्यासाठी आतापासूनच उपाययोजना सुरू केल्या आहेत. काही हॉटेल चालकांनी जास्त गॅस लागणारे पदार्थ बनवणे तात्पुरते थांबवले असून थेट मेनू कार्डमध्येच कपात केली आहे. इतकेच नव्हे तर, चहा वारंवार उकळण्याऐवजी एकदाच मोठ्याप्रमाणात तयार करून तो थर्मासमध्ये साठवण्यासारख्या तडजोडी कराव्या लागत आहेत. या संकटामुळे केवळ हॉटेल मालकांचेच नुकसान होत नसून, त्यावर अवलंबून असलेले हजारो कामगार, भाजीपाला विक्रेते, दूध व्यावसायिक आणि किराणा पुरवठादारांची मोठी साखळी विस्कळीत होण्याची शक्यता आहे. काही व्यावसायिक इतर शहरांतून चढ्या दराने सिलिंडर मिळवण्याचा प्रयत्न करत आहेत, परंतु यामुळे उत्पादन खर्चात मोठी वाढ होत आहे.

**सरकारने या गंभीर समस्येकडे तातडीने लक्ष देऊन गॅस पुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी जळगावमधील हॉटेल व्यावसायिकांनी केली आहे. अन्यथा, येत्या दोन दिवसांत स्थानिक अर्थव्यवस्थेवर आणि ग्राहकांवर याचे गंभीर परिणाम दिसून येतील.**

# गणपूर प्राथमिक शाळेत रंगतरंगमध्ये विद्यार्थ्यांची धमाल



प्रतिनिधी । चोपडा

**तालुक्यातील गणपूर येथील पीएमश्री जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांचा वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रम रंगतरंग २०२६ मध्ये चिमुरड्यांनी विविध गाण्यांवर थिरकत प्रेक्षकांच्या टाळ्या मिळवल्या. सुमारे अडीच तास चाललेल्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी अनेक गीतांवर नृत्य करून आपली कला सादर केली.**

शाळेत दरवर्षी रंगतरंग हा वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रम घेतला जातो. यात विद्यार्थ्यांनी विविध गीतांवर नृत्य सादर केले. गणेश वंदना, देश भक्तीपर गीते, आदिवासी गीते, कोळीगीत, समूहगीते व विविध गीतांवरील नृत्यासह अनेक गीते यावेळी सादर केले.

सूत्रसंचालन भिका चौधरी यांनी केले. मुख्याध्यापक संजीव पाटील यांनी प्रास्ताविक करून शालेय अहवाल सादर केला.